इरादा पत्र

जा.क्र.शिउसं/नावि/माध्य २/स्वअशा/२०१९
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक
दिनांक :- २५/०६/२०१९
27

प्रति,

**अध्यक्ष/सचिव,**
**महात्मा गांधी तालुका महाविद्यालयीन शिक्षण मंडळ,चोपडा ता.चोपडा जि.जळगांव संचलित ऑक्सफर्ड इंग्लिश मिडीयम स्कुल,चोपडा ता.चोपडा जि.जळगांव**

**विषय** : सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत (उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक ते उच्च माध्यमिक) शाळेस परवानगी देण्याबाबत

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक एसएफएस-२०१९/प्र.क.५१२ /एसएम-२/ मुंबई दि. १० जून २०१९

उपरोक्त विषयांचे संदर्भन्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षासाठी ( उच्च प्राथमिकला जोडून माध्यमिक व उच्च माध्यमिक) शाळा स्थापन करणेकरिता / मान्यता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावा नुसार आपल्या संस्थेस संदर्भ शासन निर्णया नुसार ( प्राथमिक ला जोडून माध्यमिक ते उच्च माध्यमिक ) इंग्रजी माध्यम शाळेस मान्यता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे इरादा पत्र देण्यात येत आहे.

| अ. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम / मंडळ संलग्न | वर्ग मान्यता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ७ | ८ |
| १ | जळगांव | **महात्मा गांधी तालुका महाविद्यालयीन शिक्षण मंडळ, चोपडा ता.चोपडा जि.जळगांव** | **ऑक्सफर्ड इंग्लिश मिडीयम स्कुल,चोपडा ता.चोपडा जि.जळगांव** | इंग्रजी (सी.बी.एस.ई.) | इयत्ता ९ वी ते १२ वी (सर्व शाखा ) | २०१७-१८ |

**अटी व शर्ती -**

१) संदर्भ शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या शाळेचे, संस्थेने शाळा परवानगीसाठी प्रस्तावित केलेले माध्यम व शाळेचे प्रस्तावित केलेले ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही तसेच भविष्यात या शाळेचे अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२) शासन निर्णय २.२ अटी व शर्ती १ ची कागदपत्राची पूर्तता ३ महिन्यात तातडीने करावी.

३) आपण प्रस्तुत ठिकाणी सुरु करणार असलेल्या शाळेच्या संदर्भात शासन निर्णय १ मधील परिच्छेद क्र.२ च्या २.१ ते २.८ मधील तरतुदीचे /अटी व शतीचे पालन करणे आपणावर बंधन कारक राहील. तसेच शासनाची परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

४) व्यवस्थापनाने शाळा मान्यते करिता माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ०३ परिशिष्ठ ०२ मधील विहीत नमुन्यात एक महिन्याच्या आत संस्था सचिवाच्या स्वाक्षरीने अंतीम/ प्रथम परवनगी प्रस्ताव संबंधीत जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

५) तसेच सन २०१७-१८ पासून त्या शाळेचा मान्यता मिळालेला वर्ग सुरू करता येईल त्या नंतरचे वर्ग नैसर्गिक वाढीने टप्प्या टप्प्याने सुरू करता येतील.

६) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) मुख्या अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७) पूर्वी राष्ट्रीयकृत बँकेत विहीत रक्कम बचत प्रमाणपत्र / मूदत ठेव ठेवलेली नसल्यास, त्याबाबत पूर्तता करून शाळा प्रथम / अंतिम परवानगीचा प्रस्ताव सादर करतांना राष्ट्रीयकृत बँकेत ठेवून आपल्या जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांच्याकडे मूळ बचत प्रमाणपत्र / मूदत ठेव पावतीची मूळ प्रत जमा करणे आवश्यक राहील.

(कृ.मा.प.)

८) या पत्रान्वये ज्या शाळा सुरु करण्यास परवानगी दिल्याचे कळविण्यात आलेले आहे, त्याप्रमाणे शाळा सुरु करुन सक्षम प्राधिकाऱ्याकडून माध्यमिक शाळा संहिता नियम १९८६ च्या ३.२ प्रमाणे विहीत नमून्यात अर्ज करुन मान्यता न घेतल्यास आपली सुरु असलेली शाळा अनाधिकृत (मान्यता नसलेली शाळा) समजण्यात येईल.

९) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा / वर्ग** असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील. व वेळोवेळी करण्यात येणाऱ्या पत्रव्यवहारावर स्वयं अर्थसहाय्यित शाळा / वर्ग असे लिहिणे बंधनकारक राहील.

१०) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरतेवेळी स्वयं अर्थसहाय्यित शाळा / वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

११) सदरच्या शाळा चालविण्याबाबत शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले सर्व प्रचलित नियम व भविष्यात शासन वेळोवेळी विहित करेल अशा सर्व नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेवर तसेच शाळेवर बंधनकारक राहील.

**(नितीन बच्छाव )**
**शिक्षण उपसंचालक,**
**नाशिक विभाग, नाशिक**

प्रत - माहिती व पुढील कार्यवाहीस्तव
शिक्षणाधिकारी ( माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगांव यांना देऊन सूचित करण्यात येते की, यांनी आदेश संबंधित संस्थेस / शाळेस कळवावे. त्यानंतर शाळेस अंतिम व प्रथम मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव आवश्यक शिफारससह सादर करावा.